महासागर
सोमवार, दि. 7 एप्रिल 2025
अमरावती




# गांजा तस्करीत दोघे जेरबंद

**चांदूर रेल्वे हद्दीत कारवाई | 5 लाख 1 हजार 700 रुपयांचा मुद्देमाल जप्त**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 6)** चांदुररेल्वे पोलिसांनी गांजाची वाहतुक करणार्या दोन जणांना 6 एप्रिल रोजी जेरबंद केले. मनोज वामनराव मुद्रके (48, रा. वडगाव राजदी, ता. चांदुर रेल्वे, जि अमरावती, ह.मु. श्रीहरी नगर, दत्तापुर, ता.धामनगाव रेल्वे, जि. अमरावती) व खेळविंद्र राजारामजी ईटीवाले (52, रा.गुजी, ता. धामनगाव रेल्वे, जि. अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून गांजा व दुचाकी असा एकुण 5 लाख 1 हजार 700 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

6 एप्रिल रोजी चांदुररेल्वे पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, दोन इसम हे गांजा नावाचा अंमली पदार्थ घेवुन मोटर सायकलने तळेगाव दशासरकडुन राजना फाटा येथे येणार आहे. या माहितीवरून



उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या परवानगीने पोलिसांनी तळेगाव रोडने संशयीत इसमाचा शोध घेतला, त्यावेळी राजना फाटा येथे दोन इसम दोन पांढर्या रंगाच्या बोरीसह एक काळ्या रंगाची बजाज पल्सर क्रमांक एमएच 27 बीयु 2688 सह संशयीत रित्या मिळुन आले. त्यामुळे पोलिसांनी दोन्ही इसमाजवळील दोन बोरीची पाहणी केली. त्यावेळी त्यात 21.185 किलोग्रॅम गांजा दिसून आला. त्यामुळे पोलिसांनी बजाज पल्सर, दोन मोबाईल व गांजा असा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणात मनोज वामनराव मुद्रके व खेळविंद्र राजारामजी ईटीवाले यांना ताब्यात घेतले. दोन्ही आरोपींविरुध्द चांदुर रेल्वे पोलिस ठाण्यात कलम 8 (सी), 20 (ब), (द्वद्व) (सी), 29 एन.डी.पी.एस. अॅक्ट प्रमाणे गुन्हा नोदविण्यात आला आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीस पोलीस अधिकारी अनिल पवार यांचे मार्गदर्शनामध्ये पोलीस निरीक्षक अजय आकरे, सहायक पोलिस निरीक्षक शरद आहेर, पोलिस उपनिरीक्षक नितेश आझडे, नंदलाल लिंगोट, पोलीस अंमलदार शिवाजी घुगे, नितीन शेंडे, पवन घरडे, गजानन वाघमारे, प्रशांत ढोके, अश्विनी आखरे व चालक पोकों चंद्रकात गाडे यांच्या मदतीने करण्यात आली आहे.




# हातात भगवा, मुखात जय श्रीराम चा जयघोष...

## मंदिरासह शोभायात्रेत श्रीरामांच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

### अंबानगरीत दणक्यात साजरे झाले रामनवमीचे पर्व




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** – अंबानगरीमध्ये प्रभु श्रीरामाच्या जन्मोत्सव म्हणजेच रामनवमी अत्यंत भक्तीमय वातावरणात चैत्र मासातील शुक्ल पक्षातील नवमीच्या या दिवसाचे रामभक्त वर्षभर वाट पाहतात. जिल्ह्याच्या शहरासह ग्रामीण भागातही भाविकांनी हा जन्मोत्सव पूर्ण भक्तिभावाने साजरा केला. हातात भगवा आणि तोंडात प्रभु श्रीरामांचे नाव, प्रचंड उत्साहात काढलेल्या शोभायात्रांचे चित्र आज शहरात पहायला मिळाले.

रविवारी सकाळपासूनच राम आणि हनुमान मंदिरात दर्शनासाठी वर्दळ होती. अयोध्येतील राम मंदिरावर अनेक वर्षांच्या प्रदीर्घ लढाईनंतर स्थापन झालेल्या मंदिरात प्रभू श्रीराम विराजमान झाल्यानंतर नागरिकांमध्ये आस्था आणि उत्साह द्विगुणीत झाला आहे. त्यामुळे प्रत्येक रामनवमीला रामभक्तांमध्ये उत्साह दांडगा असल्याचे जाणवते. त्यामुळे रामनामाचा जयघोष आणि चहुबाजूंनी भगवे झेंडे फडकल्याने वातावरण भगवेमय झाले होते. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रीरामनवमीनिमित्त विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या नेतृत्वाखाली अनेक हिंदू संघटनांकडून शोभा यात्रा काढण्यात आली. स्थानिक बालाजी प्लॉट येथील सीताराम बाबा मंदिरापासून विधीवत श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन करून शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली.





**अमरावती : रामनवमीच्या पर्वावर येथील विश्व हिंदू परिषद, बजरंग दल कडून काढण्यात आलेल्या शोभायात्रे दरम्यान राजकमल चौकात माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांनी प्रभु श्रीरामांच्या मूर्तिचे पूजन केले. यावेळी आ. रवि राणा, माजी खा नवनीत राणा, जयंत डेहनकर, दिनेश सूर्यवंशी, भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. छायाचित्र – मनिष जगताप**



### राजकमल चौकात भव्यदिव्य स्वागत

शहरातून विविध ठिकाणावरून निघालेल्या शोभायात्रा राजकमल चौकात एकत्रित आल्या होत्या. एकापेक्षा एक आकर्षीत झाक्यांमधून या शोभायात्रा निघाल्या होत्या. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी भाविकांची प्रचंड गर्दी दिसून आली. रामसिता-लक्ष्मण यांच्यासह हनुमानजींच्या भव्यदिव्य मुर्त्यां शोभा वाढविणार्या व आकर्षक ठरल्या होत्या. राजकमल चौकात डीजेच्या तालावर श्रीरामाचा प्रचंड जयघोष करण्यात आला.

### आग उडविणाऱ्याला पोलिसांचा प्रसाद



रामनवमीच्या पर्वावर निघालेल्या शोभायात्रे दरम्यान लाइटर मधून आग उडविणाऱ्या एका इसमाने बेजबाबदारपणे आग उडविल्याने लोकप्रतिनिधींच्या अंगावर विस्तव गेला. वारंवार सांगूनही ऐकत नसल्याने उपायुक्त शिंदे यांनी या इसमाला ठोकुन काढले. यावेळी पोलिस मचान द्वारे शोभा यात्रेवर लक्ष ठेवून होते.

### पत्नीच्या छळामुळे पतीची रेल्वेखाली आत्महत्या

**अमरावती** – पैशाची मागणी करून पत्नीने छळ केल्याने पतीने शेगाव रेल्वेसमोर उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना पुढे आली आहे. कृणाल सुधीर खेरडे (35, रा. वरुड) असे मृताचे नाव आहे. या घटनेची तक्रार मृतकाचे वडील सुधीर मारोतराव खेरडे (70, रा. खारीपुरा, सावता चौक मागे, रा. वरुड) यांनी 5 एप्रिल रोजी वरुड पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी पत्नी रीना कृणाल खेरडे (रा.आंबेडकर चौक, लाखांदूर, जि. भंडारा, ह.मु. विजोरा, बार्शीटाकळी, अकोला) हिच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. सुधीर खेरडे यांच्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा कुणाल खेरडेचे रीनासोबत प्रेमविवाह झाला होता. तो बाहेरगावी कामानिमित्त गेला असता, त्याने पत्नीला नेले होते. परंतू रीना ही कुणाल पैशांसाठी त्रास देत होती. त्यामुळे तो मानसिक तणावात आला होता. दरम्यान त्याने पत्नीच्या त्रासाला कंटाळून शेगाव पोलीस ठाण्यांतर्गत येणार्या रेल्वे समोर येऊन आत्महत्या केली.

## निष्काळजीपणामुळे दुचाकी चालकाचा मृत्यू

- दुचाकी धडकविली भिंतीवर
- महालक्ष्मी नगर चौकातील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 6)** ब्रेक कमकुवत असतानाही एका तरुणआने निष्काळजीपणाने दुचाकी चालवून ती मंदिराच्या भिंतीवर धडकविली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला.

ही घटना राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महालक्ष्मी नगर चौकातील विठ्ठल मंदिराजवळ 1 एप्रिल रोजी घडली होती. रोहन राजेश राठोड (25, रा. मेहेरबाबा कॉलनी, अमरावती) असे मृताचे नाव आहे. या घटनेची फिर्याद सचिन विठ्ठलराव मडावी (25, रा. जेवड नगर) यांनी राजापेठ पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. सचिन मडावीच्या तक्रारीनुसार, सचिन मडावी हा महालक्ष्मीनगरातील मंडप डेकोरेशनचे वाहन रिकामे करत होते. तेवढ्यात रोहन तेथे आला आणि एका मैत्रिणीला भेटायला जायचे असल्याने तु माझ्यासोबत चल, असे तो सचिनला म्हणाला. त्यावेळी रोहनने तेथे उपस्थित असणारा रितेश वानखडे यांला त्याची दुचाकी मागितली. त्यावेळी रितेशने सचिनला सांगितले की, गाडीचे ब्रेक कमकुवत आहेत, हळू चालवा. त्यानंतर रोहन आणि सचिन असे दोघेही दुचाकीने मैत्रिणीला भेटायला निघून गेले. त्यावेळी रोहन हा दुचाकी भरधाव चालवत होता. दरम्यानच महालक्ष्मी नगर चौकात रोहनचा दुचाकीवरील ताबा सुटला आणि त्यांची दुचाकी तेथील विठ्ठल मंदिराच्या भिंतीवर जाऊन धडकली. या अपघातानंतर सचिन आणि रोहन हे दोघेही खाली पडले. त्यानंतर त्यांनी मित्रांना फोन करून बोलावून घेतले. त्यानंतर दोन्ही जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी रोहन राठोडला मृत घोषित केले.

## आपल्या वडीलांच्या कारचालकाची हत्या

### दोन आरोपींना अटक

### विशेष पथकाची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती** – गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नवसारी परिसरात एका कारचालक तरुणाची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. तेजस उर्फ अनिकेत अविनाश नळकांडे (24, रा. मायानगर, अमरावती) असे मृतकाचे नाव आहे. ही 5 एप्रिल रोजी रात्री गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीतील नवसारी परिसरातील गुलशननगरमध्ये घडली. घटनेनंतर काही तासांतच पोलीस आयुक्तांच्या विशेष पथकातील पोलिसांनी आरोपी उमर युनूस चौधरी (20, रा. गुलशनगर, अमरावती) आणि शहजाद खान नूर खान (28, रा. सुफियाना पार्क, अमरावती) या दोघांना अटक केली आहे.घरात भांडण लावीत असल्याचा आरोप या कारचालकावर या मारेकऱ्यांनी केला आहे.

तेजस नळकांडे हा मागील दोन वर्षांपासून गुलशननगर येथील शेख अकील शेख कय्युम यांच्या कारवर चालक म्हणून कार्यरत होता. दरम्यान, शनिवारी रात्री शेख अकील शेख कय्युम व त्यांच्या पत्नीचे कडाक्याचे भांडण झाले. त्यावेळी तेजस नळकांडे हा तेथे उपस्थित होता. दरम्यान, भांडण सुरू असतानाच शेख अकील शेख कय्युम यांचा सावत्र मुलगा उमर युनूस हा घरी पोहोचला. आमच्या घरात होणाऱ्या वादासाठी तूच जबाबदार आहे, असा ठपका ठेवत उमर युनूसने तेजसवर चाकूने हल्ला चढविला. यामध्ये तेजस गंभीर जखमी झाला. शेख अकील शेख कय्युम यांनी त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तेजसला मृत घोषित केले. या प्रकरणी मृत तेजसचे वडील अविनाश यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास आरंभला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्तांच्या विशेष पथकाने आरोपीचा शोध सुरू केला. त्यावेळी उमर युनूस चौधरी हा त्याचा मित्र शहजाद खान नूर खान याने दिलेल्या दुचाकीने पळाला असून तो शेगाव येथे असल्याची माहिती विशेष पथकाला मिळाली. त्या आधारावर पथकाने उमर युनूस याला शेगाव येथून अटक केली. त्यानंतर उमर युनूसला दुचाकी देऊन सहकार्य करणाऱ्या शहजाद खानलासुद्धा अटक करण्यात आली. त्यांना पुढील कारवाईसाठी गाडगेनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई विशेष पथकाचे पोलीस निरीक्षक आसाराम चोरमले, साहाय्यक पोलीस निरीक्षक अनिकेत कासार, युसूफ सौदागर, आशिष डवले, रणजित गावंडे, अमोल मनोहर, निवृत्ती काकड, रुपेश काळे, गजानन सातंगे यांनी केली.

## विकायला काढले तर रडविते अन घरात ठेवले तर सडते

### कांद्याची आवक वाढताच गडगडले भाव



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )** – काही दिवसांपूर्वी कांदा आणि लसूणला चांगला भाव मिळत होता. परंतु, नजीकच्या काळात नवीन कांदा आणि लसूण निघाल्याने बाजारात आवक वाढली. त्यामुळे भावही कोसळले आहे. कांदा पिकवून चांगले पैसे मिळतील, या आशेवर असणाऱ्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरी निराशा आल्याचे बघायला मिळत आहे.

महागडे रोप, खते विकत आणून शेतकऱ्यांनी कांद्याची लागवड केली. बेड व वाफे पद्धतीवर पीक घेण्यासाठी मोठा खर्च करण्यात आला. मोठ्या उमेदीने कांद्याची लागवड करण्यात आली. तसे पाहिले तर कांद्याच्या भावात नेहमी चढउतार येत असतात. तेजीच्या काळात ज्यांचा कांदा निघतो, त्यांच्या गाठीशी चार पैसे अतात. परंतु, मंदीच्या काळात आलेला कांदा शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडवून जातो. कारण मंदीच्या काळात कांदा साठवून ठेवतो म्हटले तर यावर मोठा खर्च करावा लागतो. दुसरीकडे भाव वाढेल की नाही, याचाही नेम नसतो. सध्या कांद्याला 10 ते 15 रुपयांच्या दरम्यान भाव मिळत आहे. भाजीमंडीत मिळणाऱ्या दरातच आज विविध ठिकाणी रस्त्यावर दुकान थाटून बसणाऱ्या विक्रेत्यांकडूनही सारख्याच दरात कांदा उपलब्ध होत आहे. शेतकरीही वाहनांमध्ये कांदा भरून आणत दुकान लावून विक्री करत असल्याचे दिसून येते. कांदा पीक घेण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. यासाठी लागणारे इंधन, मजुरी आणि मशागत खर्चात दुपटीने वाढ झाली आहे. दुसरीकडे मात्र कांद्याच्या किमतीत मंदी आली आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

## महाडीबीटी शिष्यवृत्तीच्या अर्जासाठी 30 मेपर्यंत मुदतवाढ

**अमरावती** – सामाजिक न्याय विभागाकडून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी प्रणालीवर चालविल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत वाढवण्यात आली. आहे. सन 2024-25 या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन अर्ज तसेच नूतनीकरणाचे अर्ज 30 मेपर्यंत भरता येणार आहे. यासोबतच सन 2023-24 या वर्षातील ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे परत पाठवण्यात आले होते. त्यांनाही पुन्हा अर्ज करता येणार आहे. समाजकल्याण विभागाचे साहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी याबाबतची माहिती दिली. महाडीबीटीच्या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## विद्यार्थी विकास संचालकपदी डॉ. राजीव बोरकर यांची पुनर्नियुक्ती

**अमरावती** – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाच्या संचालक पदी डॉ. राजीव बेरकर यांची तीन वर्षांसाठी पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. राजीव बोरकर यांचा संचालक, विद्यार्थी विकास पदाचा तीन वर्षांचा कार्यकाल 31 मार्च रोजी संपला होता; परंतु कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी डॉ. राजीव बोरकर यांचा कालावधी आणखी वाढवून दिला. त्यामुळे आता त्यांना आणखी तीन वर्षे ही जबाबदारी सांभाळावी लागणार आहे.

## नांदगावात चणा विक्रीसाठी नोंदणी

**अमरावती** – केंद्र शासनाच्या हमीभाव योजनेंतर्गत हंगाम 2024-25 करिता नांदगाव खंडेश्वर केंद्रावर नाफेडकडून चणा खरेदी होणार आहे. त्यासाठी ऑनलाइन नोंदणीला 4 एप्रिलपासून खरेदी-विक्री सहकारी संस्थेच्या कार्यालयात सुरूवात होणार आहे. शासनाने 5 हजार 635 रूपये हमीभाव जाहीर केला आहे. चना नोंदणीचा कालावधी लक्षात घेता शेतकऱ्यांनी चना विक्रीसाठी नोंदणी प्रक्रिया जलद गतीने होण्याच्या दृष्टीने नजीकच्या सेतू केंद्रावरून किंवा मोबाइल ॲपद्वारे नोंदणी करून घेणे अपेक्षित आहे.

## वैनगंगा नळगंगा नदी जोड योजना

**अमरावती** – वैनगंगा नळगंगा नदी जोड योजना महाराष्ट्र शासनाचा महत्वाचा प्रकल्प आहे. यावर 1 हजार कोटी खर्च होणार आहे; मात्र त्यामध्ये वरुड-मोर्शीचा समावेश नव्हता. त्यामुळे शासनाकडे पाठपुरावा केल्यावर वरूड - मोर्शी मतदार संघाचाही या प्रकल्पामध्ये समावेश करून देण्यात आला आहे. दरम्यान, आष्टीवरुन पाइपलाइनने पाणी लिफ्ट करता येईल, अशी योजना असून या योजनेमुळे भविष्यात शेतकऱ्यांना पाण्याची कमतरता पडणार नाही. वैनगंगा-नळगंगा या योजनेच्या सर्वेबाबत निविदा निघाली असून, हा प्रकल्प पूर्ण होण्यास तीन वर्षे लागणार आहे. याशिवाय वरुड शहरात नवीन बायपासचे सर्व्हेक्षण झाले असून, यासंदर्भात केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष राजकुमार राऊत, शहराध्यक्ष योगेश्वर खासबागे, माजी नगराध्यक्ष रविंद्र थोरात आदी उपस्थित होते.

# पीएम मित्रा मेगा टेक्सटाईल पार्कला सप्टेंबरची डेडलाईन

### 1000 एकरात होणार प्रकल्प | कामाचा श्री गणेशा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.6 )** – महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) अमरावती येथील प्रस्तावित पीएम मित्र मेगा टेक्सटाईल पार्कमध्ये रस्ते, नाले, पाणी या मूलभूत सुविधांच्या कामाला सुरुवात झाली आहे. सर्व कामे पूर्ण करण्यासाठी सप्टेंबरची डेडलाईन देण्यात आली आहे.

येथे 111 कोटी रुपये खर्चून काम केले जात आहे. मूलभूत सुविधा उपलब्ध झाल्यानंतर इतर कामे सुरू केली जातील. अमरावती येथे सुमारे 1000 एकर जागेत पीएम मित्र टेक्सटाईल पार्क उभारले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 20 सप्टेंबर 2024 रोजी मेगा पार्कचे ऑनलाइन भूमिपूजन केले होते. मेगा टेक्सटाईल पार्कचे उपविभागीय



अभियंता, सुधिर अमृतकर यांनी सांगितले की, गेल्या अनेक दिवसांपासून तेच काम सुरू झाले आहे. या संदर्भात सप्टेंबर महिन्यापर्यंत हे काम पूर्ण होईल, असे सूत्रांचे म्हणणे आहे. यानंतर उद्योग उभारणीसाठी इच्छुक असलेल्यांसोबत सामंजस्य करार केला जाणार आहे. 1000 एकर जागेवर साकारल्या जाणाऱ्या मेगा टेक्सटाईल पार्कमध्ये वाहतुकीसाठी 9 किलोमीटरचा रस्ता तयार करण्यात येणार आहे. ज्याचे काम सुरू झाले आहे. येथे नाल्याही बांधण्यात येणार आहे. परिसरात 9 किमीची पाइपलाइन टाकण्यात येणार आहे. याशिवाय इतर कामे केली जाणार आहेत. उद्योगांसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यासाठी येथे 60 लिटरची पाण्याची टाकी बांधण्यात येणार आहे. 9 किमीची पाइपलाइनही टाकण्यात येणार आहे.

### विमान सेवेचा होणार लाभ

लवकरच मुंबई ते अमरावती दरम्यान विमानसेवा सुरू होत आहे. त्यामुळे उद्योजकांना ये-जा करताना सुविधा उपलब्ध होणार आहे. याचा फायदा केवळ मेगा टेक्सटाईलच नाही तर इतर उद्योजकांनाही होईल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

### असा आहे मेगा टेक्सस्टाईल पार्क

भारताने आपल्या वस्त्रोद्योग क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी सात मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रीजन आणि ॲपेरल (पीएम मित्रा) पार्क स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. ही उद्याने रोजगार निर्मिती करतील, गुंतवणूक आकर्षित करतील आणि जागतिक कापड उत्पादनात भारताचे स्थान मजबूत करतील. वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून, भारत सरकारने विविध राज्यांमध्ये सात पीएम मित्र उद्यानांच्या विकासासाठी अधिकृतता प्रदान केली आहे. देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे, आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि रोजगार निर्मिती करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. या वस्त्रोद्योग उद्यानांद्वारे, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांसह आणि उत्पादकांसाठी स्पर्धात्मक फायदे असलेले कापड उत्पादनाचे जागतिक केंद्र म्हणून भारताची स्थापना करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. पीएम मित्र योजना निर्यात आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन देईल आणि वस्त्रोद्योग क्षेत्रातील लघु आणि मध्यम उद्योगांना मदत करेल.महाराष्ट्राम केवळ अमरावती येथेच सदर मेगा टेक्सस्टाईल पार्क तयार होत आहे.



# चांदूर रेल्वेत माजी आमदार स्व. डॉ. पांडुरंग ढोले यांची पुण्यतिथी

### स्व. डॉ. पांडुरंग ढोले विचारमंच व मित्र परिवाराचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.6 )** – ओ.बी. सी स्कॉलरशिपचे शिल्पकार, ओ.बी.सी. क्रांतीदलाचे संस्थापक, लोकनेते माजी आमदार स्व. डॉ. पांडुरंग ढोले यांचा 8 वा पुण्यतिथी कार्यक्रम रविवार (6 एप्रिल) रोजी चांदूर रेल्वे शहरातील ढोले कॉम्प्लेक्समधील स्व.डॉ. पांडुरंग ढोले विचारमंच कार्यालयात कार्यकर्ते व मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आला.

या छोटेखानी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चांदूर रेल्वे नगर परिषदचे माजी उपाध्यक्ष नितीन गवळी हे होते. यावेळी ढोले हॉस्पिटलचे संचालक डॉ. क्रांतीसागर ढोले, डॉ. अनुया ढोले, न. प. उपाध्यक्ष नितीन गवळी व इतरांनी स्व.डॉ. पांडुरंग ढोले यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून अभिवादन केले. ढोले हॉस्पिटलचे संचालक डॉ. क्रांतीसागर ढोले, माजी न. प. उपाध्यक्ष नितीन गवळी, कॉ. विनोद जोशी, गौरव सव्वालाखे, संजय डगवार, जनता दलाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर भगत, शंकरराव आंबटकर, डॉ. उत्तमराव पडोळे, रमेश कुबडे यांनी आपले विचार व्यक्त करतांना सांगितले की, स्व. डॉ. पांडुरंग ढोले हे आज आपल्यात नाही. त्यांच्या जाण्याने या मतदार संघात एक पोकळी निर्माण झाली असून ती कधीही भरून निघणारी नाही, परंतु त्यांचे विचार मात्र आजही जिवंत आहे. डॉ. पांडुरंग ढोले यांनी स्वत:च्या बळावर नेतृत्व करून सामान्य जनतेसाठी संघर्ष केला. त्यांनी केलेला आक्रमक संघर्ष हा अविस्मरणीय असून हा विचार आम्ही कधीही विसरू शकत नाही असे मत याप्रसंगी व्यक्त करण्यात आले. सदर कार्यक्रमाला छाया झाडे, मेहमूद हुसैन, कमोद चौकडे, साहेबराव शेळके, भीमराव खलाटे, सुधीर सव्वालाखे, प्रमोद बिजवे, अंबादास हरणे, देविदास शेबे, रमेश गुल्हाने, विठ्ठलराव गुल्हाने, धर्मराज वरघट, अंबादास हरणे, संजय डगवार, दादाराव डोंगरे, मोरेश्वर हेरोडे, आर. एन. गुल्हाने, प्रमोद हेरोडे, राजेंद्र हेरोडे, ज्ञानेश्वर भोगे, अवधूत सोनवणे, सौरभ कारमोरे, सर्वजित ढोले, राजेश्वरी ढोले आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्र संचलन व आभार प्रदर्शन संजय डगवार यांनी केले.

## अल्पवयीन मुलीला नेले पळवून

**अमरावती** – एका अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवून नेल्याची घटना वरुड पोलिस ठाण्याच्या हद्दीत 2 एप्रिल रोजी उघडकीस आली. या घटनेची तक्रार 40 वर्षीय महिलेने वरुड पोलिस ठाण्यात नोंदविली आहे. त्यानुसार पोलिसांनी आरोपी गोलु ऊर्फ ज्ञानेश्वर गावंडे (30) याच्याविरुध्द अपहरणाच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

# मंगळवारी स्वातंत्र्य सैनिकांसाठी आरोग्य तपासणी मेळावा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 6 )** – स्वातंत्र्य सैनिकांच्या त्याग आणि बलिदानाला सलाम करण्यासाठी, सामान्य प्रशासन विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. येत्या मंगळवारी, 8 एप्रिल, 2025 रोजी सकाळी 11 वाजता, जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे स्वातंत्र्य सैनिक, त्यांच्या विधवा पत्नी आणि आणीबाणी मानधनधारकांसाठी विशेष आरोग्य तपासणी आणि संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शासनाने जाहीर केलेल्या 100 दिवसांच्या 7 कलमी कृती आराखड्याचा हा एक भाग आहे. या मेळाव्यात स्वातंर्त्यसैनिकांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याची तपासणी केली जाईल. स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान आणि त्याग देशाला स्वातंर्त्य मिळवून देण्यासाठी अमूल्य ठरला आहे. या मेळाव्याला जिल्ह्यातील सर्व स्वातंर्त्य सैनिक, त्यांच्या विधवा पत्नी आणि आणीबाणी मानधनधारकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांनी केले आहे.

# राहुल व्यायाम मंडळात सम्राट अशोक जयंती

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 )**– राहुल व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती भूमिपुत्र कॉलनी, या संस्थेच्या कार्यालयात चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष समाज भूषण मधुकर अभ्यंकर हे होते.

यावेळी सम्राट अशोक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. सम्राट अशोक यांनी सत्य, अहिंसा, प्रेम आणि सहिष्णुतेवर आधारित धम्म (धर्माचा मार्ग) स्थापन केला,



ज्यामध्ये त्यांनी लोकांना चांगली वागणूक आणि परस्परांबद्दल आदर करण्याचा संदेश दिला, असे प्रतिपादन मधुकर अभ्यंकर यांनी केले. या कार्यक्रमानला संस्था अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर, शुभांगी अभ्यंकर, गजानन वानखडे, सतीश पुंडकर, जीवन फसाटे, समर्थ अभ्यंकर, गौरवनाथ पर्वतकर उपस्थित होते.

# संजिता महापात्रांची सामान्य प्रशासन विभागाला भेट

### उत्कृष्ठ कार्याबद्दल अधिकारी-कर्मचाऱ्यांची प्रशंसा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 6 )** – अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांनी सामान्य प्रशासन विभागाला भेट दिली. यावेळी त्यांनी सन 2024-25 मध्ये सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी उत्कृष्ठ काम केल्याबद्दल त्यांची प्रशंसा केली आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. तसेच यावर्षी सुद्धा कर्मचाऱ्यांच्या 100 टक्के पदौन्नती व आश्वासीत प्रगती योजना आणि



पेन्शन प्रकरणे निकाली काढण्याबाबत सुचना दिल्यात. कार्यालयीन कामासाठी येणाऱ्या नागरीकांना सन्मानाने वागणूक देण्याबाबत निर्देश देवून महापात्रा यांनी बालासाहेब बायस यांचे उत्कृष्ठ काम केल्याबद्दल कौतुक केले.

# राष्ट्र निर्मितीसाठी संघटन वाढवा-भिकाभाई पटेल

### राज्य शिक्षक परिषदेची आढावा बैठक ■ कर्तुत्ववान महिलांचा सन्मान

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 6 )** – राष्ट्र निर्मितीसाठी व नवीन पिढी तयार करण्यासाठी चांगले संघटन तयार करून निर्माते व्हा, असे आवाहन अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे उपाध्यक्ष भिकाभाई पटेल यांनी केले. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या आढावा बैठकीत मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते.

राजापेठ स्थित समुत्कर्ष भवण संघ कार्यालयात अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ संलग्नित महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग अमरावती विभागाची आढावा बैठक भिकाभाई पटेल गुजरात यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी प्रांताध्यक्ष



मधुकर उन्हाळे, प्रांतकार्यवाह पुरुषोत्तम काळे प्रामुख्याने उपस्थित होते. अध्यक्षस्थानी जेष्ठ कवियीत्री वंदना विंचूरकर होत्या. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांचे जाहीर व्याख्यान आणि कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला.

जिल्ह्यातील कर्तृत्ववान शिक्षिका प्रा. डॉ. वनिता काळे, वैशाली ढाकुलकर, शितल देशमुख, प्रतिभा काठोळे, जयश्री शेकार, वैशाली परतीके, श्रीमती शारदा सरोदे, देवकी अवघड यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला विभाग कार्यवाहक सुमित पवार, प्रांत उपाध्यक्ष अवधूत वानखडे, विठ्ठलराव महाले, विभागीय सचिव किशोर तळोकार, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे सचिव सुनील वाघमोडे, कार्याध्यक्ष ओंकार तीवडकर, कोषाध्यक्ष उज्वल सुमकुरवार, संघटक बालाजी केंद्रे, दीपक जोशी, साबळे यांच्यासह विविध जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष, सचिव, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा महीला आघाडी प्रमुख वैशाली गरकल यांनी तर प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष रवी घवळे यांनी केले. आभार विभागीय अध्यक्ष धनराज कांदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रवी घवळे, धनराज कांदे, वैशाली गरकल, ज्योती सानप, दर्शन गंधे, वर्षा भांदर्गे, योगेश्वर काठोडे, प्रविण डवके, प्रवीण खैरकर, माया थोरवे यांनी परिश्रम घेतले.

# उदंड झाल्या शाळा; विद्यार्थ्यांची मात्र वाणवा

### कोणी प्रवेश घेता का प्रवेश ? ■ घरोघरी फिरतात शाळेंचे शिक्षक



**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट,( दि.6 )** – आधी शाळेत प्रवेश घेण्यासाठी पालक स्वत: शाळेत जात होते. आता मात्र विद्यार्थी देता का कोणी विद्यार्थी, असे म्हणण्याची वेळ खासगी विनाअनुदानित शाळांवर आली आहे. याला कारण शाळांची वाढती संख्या. शाळेतील प्रवेश वाढावे यासाठी शाळांनी मार्केटिंग प्रतिनिधी नेमले आहेत. यांच्यामार्फत घरोघरी जाऊन शाळांची जाहिरात केली जात आहे व तुमच्या पाल्याला आमच्याच शाळेत प्रवेशित करा, अशी पालकांना गळ घातली जात आहे.

### भर दुपारी वाजते घंटी...

सध्या उन्हाळ्याच्या सुट्या असल्याने पालक दुपारच्यावेळी आराम करतात. शाळांनी नेमलेल्या या मार्केटिंग प्रतिनिधीकडून अनेकदा भरदुपारी दाराची बेल वाजवली जाते व तुमच्या घरात कोणी लहान मूल आहे का, किती वर्षांचा आहे, कोणत्या शाळेत जातो यासारखे विविध प्रश्न विचारून पालकांना भंडावून सोडत आहेत. झोपमोड झाल्याने अनेक पालकांची चिडचिड वाढली आहे.

### पुर्वपरीक्षेचा फंडा...

शाळा हा संस्थाचालकांसाठी व्यवसाय झाला आहे. सुविधा देतो या नावाखाली पालकांकडून अव्वाच्या सव्वा शुल्क आकारले जात आहे. त्यात आता नवीन म्हणजे प्रवेशाच्या आधी पूर्वपरीक्षा घेऊन विद्यार्थ्याला काय काय येते हे पाहिले जात आहे. त्यावर विद्यार्थ्यांचे शुल्क काही शाळांकडून ठरविले जात आहे. याचा मनस्ताप पालकांना सहन करावा लागत आहे.

दिवसेंदिवस तालुक्यातील खासगी विनाअनुदानित इंग्रजी माध्यमांच्या शाळांची संख्या वाढत आहे. शहरातील विविध भागांत अर्ध्या अर्ध्या किमीच्या अंतरावर एक शाळा आहे. मात्र या शाळांना हवे तेवढे प्रवेश मिळत नाही. पालक आपल्या पाल्याला नावाजलेल्या तसेच मोठ्या शाळेत प्रवेशित करत आहेत. त्यामुळे या शाळांच्या व्यवस्थापनाला विद्यार्थी मिळविण्यासाठी नवनवीन युक्त्या कराव्या लागत आहेत. गेल्या काही वर्षांपासून शाळांनी केवळ प्रवेश वाढविण्यासाठी शिक्षकांनाच कामाला लावले आहे. शाळा असलेल्या भागात घरोघरी जाऊन शाळेत प्रवेशित करण्यासाठी विद्यार्थी आहे का, याचा शोध घ्यावा लागत आहे. शालेय प्रशासन एवढ्यावरच थांबले नाही तर अनेक शाळांनी प्रवेश वाढविण्यासाठी प्रवेशाच्या काळापुरते मार्केटिंग प्रतिनिधीही नेमले आहेत.

### पत्रकांचाही खर्च

संस्थाचालकांकडून शाळेत असणाऱ्या सोयीसुविधांचे पत्रक छापून ते गल्लोगल्ली वाटले जात आहे. हे वाटपासाठी शाळांकडून मुले लावली जात आहेत. रोज चार पाच पत्रके घरोघरी टाकले जात आहेत. तसेच एखाद्या गर्दीच्या ठिकाणी, शाळा सुटल्यावर शाळेबाहेर मुलांमार्फत ही पत्रके वाटली जात आहेत.

### फोनवरून पालकांचा छळ

अनेक शाळांकडून आमच्या शाळेत आपला पाल्य प्रवेशित करा यासाठी फोन केले जात आहेत. त्यावरही पालकांना अनेक प्रश्न विचारून शाळेची प्रतिनिधी त्रस्त करत आहे. पालकांनी आम्हाला प्रवेश नकोय, असे सांगितले तरीही पुन्हा पुन्हा फोन अनेक शाळांकडून येत असल्याचे पालकांनी सांगितले.

# प्रा. राम मेघे इन्स्टिटयूटच्या विद्यार्थ्यांची टीसीएसमध्ये निवड

### वर्षभरात 300 हून अधिक विद्यार्थ्यांना प्लेसमेंट

**महासागर प्रतिनिधी**

**बडनेरा, ( दि. 6 )** – युथ वेलफेअर सोसायटीद्वारा संचलित बडनेराच्या प्रा. राम मेघे इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च येथील आकाश पंडित, वेदांत पेटे आणि तनुश्री वडूरकर यांनी प्रतिष्ठित टीसीएस कोडवीटा स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले असून त्यांची या कंपनीमध्ये उच्च पदावर निवड झाली आहे. या निवडीमुळे संस्थेच्या संस्थेची गुणवत्ता पून्हा एकदा सिद्ध झाली आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल ठरले आहे. विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या विविध संस्थांमध्ये संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी आणि कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे, प्रा. डॉ. सौ. पुनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड, प्रा. गजानन काळे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजेंद्र बमनोटे यांच्या मार्गदर्शनात प्लेसमेंटसाठी विशेष उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यशाळा, व्याख्याने आणि प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. महाविद्यालयाने शैक्षणिक सत्र 2024-25 मध्ये 300 हून अधिक विद्यार्थ्यांचे नामांकित कंपन्यांमध्ये प्लेसमेंट सुनिश्चित केले आहे. संपूर्ण अमरावती विभागात असे यश मिळवणारे हे एकमेव महाविद्यालय ठरले आहे. मागील सत्रात



(2023-24) तब्बल 704 विद्यार्थ्यांनी विविध नामांकित कंपन्यांमध्ये स्थान मिळवले होते. याशिवाय, महाविद्यालयाला छ--उ व छइ- मानांकन प्राप्त आहे. विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांच्या या अपूर्व यशाबद्दल विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी आनंद व्यक्त केला आहे. विद्यार्थ्यांच्या मेहनतीसह ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभागाच्या कुशल मार्गदर्शनाचे त्यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या संवाद कौशल्य, भाषा प्रभुत्व, ॲप्टिट्यूड आणि मुलाखत कौशल्य विकासासाठी प्रथम वर्षापासूनच विशेष प्रशिक्षण दिले जाते, जे त्यांना व्यावसायिक जगतात आत्मविश्वासाने उभे राहण्यास मदत करते, असे डॉ. धांडे यांनी नमूद केले. हे सर्व प्रशिक्षण आणि प्लेसमेंट उपक्रम ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डीन डॉ. निक्कू खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली प्लेसमेंट ऑफिसर प्रा. आनंद चौधरी आणि ट्रेनिंग ऑफिसर डॉ. प्रांजली देशमुख यांच्या अथक प्रयत्नांमुळे सातत्याने यशस्वीरित्या राबविले जात आहेत.

# राममय झाली मोर्शी नगरी







**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.6 )-** रामनवमीच्या निमित्ताने मोर्शी शहरात मोठ्या उत्साहात धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. श्रीराम जन्मोत्सवाच्या दिवशी शहरातील मंदिरांमध्ये सकाळपासूनच भक्तांची गर्दी पाहायला मिळाली. विविध मंदिरांमध्ये श्रीराम जन्मसोहळा, पूजन, हवन, व धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात आले.

संध्याकाळी शहरातील वृंदावन मंगल मंगल कार्यालयापासून विश्व हिंदू परिषद, बजरंग दल प्रखंड मोर्शी, श्रीराम नवमी उत्सव समिती मोर्शी आणि मोर्शीकर समस्त नागरिक यांचे वतीने श्रीरामाची भव्य शोभायात्रा काढण्यात आली, ही मिरवणूक श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, जयस्तंभ चौक, मुख्य बाजारपेठ ते गुजरी बाजार चौक, रामजी बाबा चौक ते अंगणांनी मंगल कार्यालयापर्यंत काढून अंगणांनी मंगल कार्यालयाजवळ मिरवणुकीचे विसर्जन करण्यात आले. श्रीराम प्रभूंच्या स्वागतासाठी चौका चौकात नयनरम्य देखावे उभारण्यात आले होते. शोभायात्रेदरम्यान विशेष डमरूपथकाद्वारे चौकाचौकात साजरी होणारी भस्म आरती, छत्रपती शिवाजी महाराजांची भव्यदिव्य अशी प्रतिमा, महाकाल पिंड, श्रीराम मूर्ती रथ, श्रीराम दरबार देखावे, स्वामी समर्थ, विश्वकर्मा देखावा, भोले शंकराची मूर्ती, महाकाल मूर्ती, वैशिष्ट्यपूर्ण ढोल पथक, आदिवासी नृत्याची धमाल, संपूर्ण शोभायात्रेला संचालित करणारे भव्य हनुमानजी मूर्ती, पुरुष वारकरी दिल्ली दोन पथक, महिला वारकरी दिंडी दहा पथक, महाकाल डमरू पथक उज्जैन, अघोरी शिवपार्वती संच, आदिवासी पठण यासोबतच बॅन्जो धुमाल पार्टीच्या तसेच तीन संच डीजेच्या नादमधुर गजरामध्ये साजरी होणारी ही शोभायात्रा एक अभूतपूर्व आनंद देणारी ठरली.यामध्ये विविध झांजपथक, बॅण्डपथक, सजवलेले रथ, आणि पारंपरिक वेशातील युवक व बालगोपाळांनी सहभाग घेतला.

### श्रीरामनवमीचा पर्वावर भव्य शोभायात्रा

### शोभा यात्रेत चौका चौकात उभारले होते देखावे

### शोभायात्रा रामनामाच्या गजराने दुमदुमली





नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा फुलांची उधळण करत शोभायात्रेचे स्वागत केले.राम जन्मोत्सवाचे औचित्य साधून विविध सामाजिक संस्थांनी आरोग्य शिबिर, अन्नदान आणि रक्तदान शिबिरांचे आयोजन देखील केले. शहरात संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. रामभक्तांनी 'जय श्रीराम' च्या जयघोषात संपूर्ण मोर्शी शहर दुमदुमून टाकले. लोकांमध्ये अभूतपूर्व भक्तीमय संचार दिसून आला.



# वरुडच्या विद्यार्थ्यांचे एनएमएमएस परिक्षेत सुयश

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.6 ) –** येथील स्व. माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एनएमएमएस परीक्षेत भारत सरकारतर्फे आर्थिक दुर्बल घटकांतील इयत्ता 8 वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या एनएमएमएस परीक्षेमध्ये उत्तम कामगिरीकरताना सुयश प्राप्त केले आहे.

शाळेतील विद्यार्थीनी खुशी धनंजय राऊत हिने या परिक्षेत अमरावती जिल्ह्यातून गुणवत्ता यादीत अकरावा क्रमांक प्राप्त केला आहे. माणिकलालजी गांधी जागृत विद्यालयातून तिने प्रथम क्रमांक मिळविला असून ती शिष्यवृत्तीस पात्र ठरली आहे. तसेच मयंक घनश्याम खासबागे हा सुद्धा या परिक्षेत जिल्ह्यातून गुणवत्ता यादीत 21 वा आला आहे. सोबतच वेदांत गवई, श्रेया मनवर, मृणाली उबाळे हे विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक विजय आडे, उपप्राचार्य मंदा चौधरी, पर्यवेक्षक प्रदीप पाटील, उप मुख्याध्यापक विजय गजबे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

# अंजनगाव स्टॉपवरून दुचाकी लंपास

**अमरावती –** परतवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अंजनगाव स्टॉपवर उभी केलेली एमएच 27 डीडी 8139 या क्रमांकाची दुचाकी चोराने लंपास केली. या घटनेची तक्रार अब्दुल अन्सार शेख ईब्राहिम (48, रा. छोटा बाजार) यांनी 2 एप्रिल रोजी परतवाडा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. या घटनेचा पुढिल तपास परतवाडा पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलिस करीत आहे.

# विमानवारी केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## विहिगाव जि. प. शाळेत कार्यक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्ज,( दि.6 ) –** अमरावजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील 14 तालुक्यामधील 28 विद्यार्थ्यांना दिल्ली येथे पाठवून त्यांना विविध स्थळे पाहुण त्याचा अभ्यास करण्याची संधी मिळवून देण्यात आली होती. परतीच्या प्रवासीत त्यांना विमानवारीही घडविण्यात आली होती. या विद्यार्थ्यांमध्ये अंजनगाव सुर्जी तालुक्यातील विहिगाव येथील जिल्हा परिषद उर्दु प्राथमिक शाळेतील गुणवंत विद्यार्थी उम्मे कुलसुम आणि यासीर अहमद यांचाही समावेश होता. या विशेष उपक्रमाकरिता निवड झाल्याबद्दल या दोन्ही विद्यार्थ्यांचा शाळेच्यावतीने नूकताच एका कार्यक्रमात कौतूक म्हणून सत्कार करण्यात आला.

अंजनगाव पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी भटेसिंग गिरासे, केंद्र प्रमुख खंडारे, अभ्यंकर, कान्हेरकर, उमक यांच्या हस्ते या मुलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गटशिक्षणाधिकारी बी. आर. गिरासे यांनी दोन्ही विद्यार्थ्यांना शालेय साहित्य भेट देऊन त्यांचे कौतुक केले. उम्मे कुलसुम आणि यासीर अहमद या विद्यार्थ्यांनी आपले विमानवारीचे अनुभव कथन केले. यापुढेही अशाच प्रकारे अभ्यासातून यश मिळवून शाळेचे नाव उंचावू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दोन्ही विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनी मुख्याधिकारी संजीता महापात्र, शिक्षणाधिकारी अरविंद मोहिरे, उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनवणे, गटशिक्षणाधिकारी भटेसिंग गिरासे यांचे आभार मानले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक सय्यद मुस्तकिम, आरिफुर्र रेहमान, मोहसीन अहमद, मोहम्मद अशपाक, श्रीमती सालेहा खानम यांनी सुद्धा दोन्ही विद्यार्थ्यांचे भेटवस्तू देऊन तसेच रमजान निमित्त शिरखुर्मा आणि मिठाईचे वाटप करून कौतुक केले.

# सर्व दिव्यांग अधिकारी-कर्मचाऱ्यांनी एकत्र यावे!

## रवींद्र पाटील यांचे आवाहन

## दिव्यांग मेळाव्या मार्गदर्शन



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.6 ) –** शासन मान्यता प्राप्त महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना मुंबईचा अमरावती विभागीय मेळावा नूकताच आयोजित करण्यात आला. हया विभागीय मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे राज्याध्याक्ष रविंद्र लोटन पाटील होते. यावेळी अमरावती जिल्हा अध्यक्ष राजेंद्र दिक्षित, वनश्री पुरस्कार प्राप्त विठ्ठल मिरगे, बुलढाणा जिल्हा सचिव किशन केणे मानेगावकर, जिल्हा कार्याध्यक्ष मुळे सर प्रामुख्याने उपस्थित होते. विभागीय मेळाव्यास मार्गदर्शन करताना राज्याध्यक्ष रवींद्र पाटील यांनी दिव्यांग अधिकारी-कर्मचारी यांनी एकत्रित येउन समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन केले.

दिव्यांगांसाठी घेतल्या जात असलेल्या शासन निर्णयांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. कारण कोणताही शासन निर्णय निघाल्यानंतर त्यावर कार्यवाही होणे अपेक्षित आहे व दिव्यांग कायदा 2016 अंतर्गत येणार्याण कायद्याची अंमलबजावणी शासनाकडून करणे आवश्यक आहे. त्याचा पाठपुरावा हा संघटनाच करते किंवा शासन स्तरावरून कोणतेही शासन निर्णय निघतात ते संघटनेच्या पाठपुराव्याने निघतात याची सर्वांनी जाणीव असू द्यावी, असे रविंद्र पाटील यावेळी म्हणाले. मेळाव्यामध्ये शासन निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत संघटनेने सतर्क राहण्याबाबत चर्चा करण्यात आली.

संघटनेचे राज्य अधिवेशन आयोजित करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच जिल्ह्यातील कार्यकारिणी, अधिकारी-कर्मचारी पदोन्नती व बदली, दिव्यांग कर्मचारी यांच्या समस्या व अडचणी, संघटना बांधणी, आदी विषयांवर चर्चा झाली. यावेळी नांदुरा तालुका अध्यक्षपदी श्रीकृष्ण सपकाळ यांची निवड करण्यात आली. धनराज सातपुतळे यांनी त्यांच्या नावाला अनुमोदन दिले. या मेळाव्याला अमरावती जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित, उपाध्यक्ष शालिनी बोरखडे, मालोकार, कार्याध्यक्ष चंद्रकांत मामनकर, कोषाध्यक्ष युवराज थोरात, प्रसिद्धीप्रमुख नितीन गायकी, राजु डांगे, सहसचिव परीक्षित बाराहाते, सदस्य किशोर माकोडे, तालुकाध्यक्ष हिमंत मते, बुलढाणा येथील जिल्हा सचिव किशन केणे मानेगावकर, सुरेश जगताप, मुळे, हिंगे यांच्यासह विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम येथील पदाधिकारी तसेच अधिकारी, कर्मचारी उपस्ति होते. कार्यक्रमाचे संचालन सचिव किशन केणे मानेगावकर यांनी तर आभार प्रदर्शन किशोर मालोकार यांनी केले.

# श्रद्धेय काळे यांचे निधन

**धामणगाव रेल्वे –** येथील पत्रकार बोधिसत्व काळे यांचे चिरंजीव श्रद्धेय काळे यांचे रविवार ला, दि.6 एप्रिल रोजी दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा सोमवारला 7 एप्रिल रोजी सकाळी 9.30 वाजता त्यांच्या नूतन चौक येथील निवासस्थानाहून निघेल.



# माजी नगरसेवक रविंद्र गुल्हाणेंचा शिंदेसेनेत प्रवेश

## उबाठा पक्षाला दिली सोडचिठ्ठी

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.6 ) –** येथील माजी नगरसेवक रवींद्र गुल्हाने यांनी शिवसेना उबाठा गटाला सोडचिठ्ठी देऊन शिवसेना एकनाथ शिंदे गटात प्रवेश केला आहे. मोर्शी शहरातील माजी नगरसेवक तथा बांधकाम सभापती रवींद्र गुल्हाने हे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांनी शिवसेनेचे तालुकाप्रमुखपद भूषविले आहे.



त्यांच्या कार्यकाळात विविध प्रकारची आंदोलने उभारून कार्यकर्त्यांना शेतकरी, शेतमजुरांना व वार्डातील नागरिकांना न्याय मिळवून देण्याचा सातत्याने प्रयत्न केला.

माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कामकाज व कार्यकर्त्यांच्या विषयीची आस्था पाहून त्यांनी शिंदे गटासोबत जाण्याचा निर्णय घेतला. शिंदे यवतमाळ दौर्याषवर आले असता, त्यांच्या उपस्थितीत झालेल्या जाहिर मेळाव्यात गुल्हाणे यांनी पक्षप्रवेश केला. यावेळी एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रवींद्र गुल्हाने यांचा भगवा दुपट्टा घालून रीतसर प्रवेश करून घेण्यात आला. श्रीराम नवमी उत्सवानंतर रवींद्र गुल्हाने यांना मुंबई येथे बोलावण्यात आले असून त्यांना शिवसेनेचे पद देण्यात येऊन मोर्शी शहराची जबाबदारी मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. पद मिळाल्यानंतर गोरगरिबांचे, शेतकरी शेतमजुरांचे व वार्डातील नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचा मी सातत्याने प्रयत्न करणार असल्याचे रवींद्र गुल्हाने यांनी सांगितले.

# बांधकाम कामगारांना आजपासून पेटीवाटप

## कामगार कल्याण मंडळाचा उपक्रम

## 600 किटचे वितरण होणार

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.6 ) –** इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ महाराष्ट्र शासन तर्फे नोंदणीकृत कामगार यांना अनेक प्रकाचे लाभ देण्यात येतात. त्याअंतर्गतच बांधकाम कागगारांसाठी मंडळाने सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करण्याचा निर्णय घेतला होता. अनेक वर्षापासून नोंदणीकृत कामगार यांना त्याचे वाटप संपूर्ण महाराष्ट्रमध्ये सुरू होते. परंतु मध्यंतरी निवडणूक कार्यक्रम असल्यामुळे शासनातर्फे सर्व लाभ थांबविण्यात आले होते. आत पून्हा सोमवार, 7 एप्रिलपासून कामगारांना या साहित्याचे वाटप सुरु होणार आहे. एकुण 600 कामगारांना हे किट वितरित केले जाणार आहे.






इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मार्फत नोंदणीकृत बांधकाम कामगार यांना पुरवण्यात येणारी सुरक्षा संच व अत्यावश्यक संच हे दिवसाला 600 लाभार्थी यांना वाटप करण्यात येणार आहे. ते दोन तालुक्यामधील असणार आहे.

म्हणजे एका तालुक्यातील 300 लाभार्थी यांना लाभ मिळणार आहे. ज्या लाभार्थीची निवड करण्यात येईल, त्यांना त्या विभागामार्फत कॉल करून माहिती देण्यात येईल. त्या लाभार्थी व्यतिरिक्त इतरांना साहित्य दिले जाणार नाही. सोमवारी अमरावती व तिवासा, मंगळवार मोर्शी व वरुड, बुधवार चंदूरबाजार व अंजनगाव, गुरुवार अचलपूर व दर्यापूर, शुक्रवार नांदगाव खंडेश्वर व भातकुली, शनिवार चंदूर रेल्वे व धामनगाव याप्रमाणे पेटी वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे. सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत नागपूर रोड, बिझीलॅड कपडा मार्केट, लाइन नं. 5, डावी सईड येथे हे वाटप होणार आहे.

# काटेरी झुडूप देताहेत अपघाताला आमंत्रण

## हिवरखेड ते गोरेगाव मार्ग झाला



**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.6 ) –** हिवरखेड ते गोरेगाव मार्ग वाटसरुंकरिता धोक्याचा बनला आहे. या मार्गावरील काटेरी झुडूप अपघाताला आमंत्रण देत आहे.

या मार्गाचा उपयोग सर्वाधिक शेतकरी करतात. आपल्या शेतातील शेत पिकांना मार्केटमध्ये नेण्याकरिता शेतकरी या मार्गाचा वापर करतात. परंतू प्रचंड वाढलेले झुडूपं वाहनधारकांना धोक्याचे ठरत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अख्त्यारित येत असलेल्या या मार्गावर संबधित विभागाने अक्षम्य दुर्लक्ष केले असल्याचे दिसत आहे. वाढलेल्या बंगाली बाभळीच्या फांद्या थेट मोटरसायकल स्वाराच्या डोळ्यात लागत असल्याने कायमस्वरुपी अंधत्व ओढविण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

या मार्गाचे झालेले डांबरीकरणही अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे पहायला मिळत आहे. बऱ्याच ठिकाणी हा मार्ग वर खाली झाल्याचे दिसत आहे. त्यामूळे भरधाव वाहने अनियंत्रित होत आहे. तसेच या मार्गात तीन नाले (ओढे) लागतात. मात्र त्यावर अद्यापही पुल करण्यात आले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे लक्ष देत योग्य कार्यवाही करण्याची मागणी केली जात आहे.